# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

### मा. महासभा दि.19/01/2019

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची "ड" मधील प्रकरण दोन (एक) (के) अन्वये प्रस्ताव**

### // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक (        )** :- राष्ट्रीय महामार्ग क्र.08 वर खासदार निधी व मनपा निधीतुन फुट ओव्हर ब्रिज बांधणे कामाबाबत.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात राष्ट्रीय महामार्ग क्र.08 वर सम्राट हॉटेल, दहिसर चेक नाका येथे फुट ओव्हर ब्रिज बांधण्यासाठी रु.74.93 लक्ष रक्कम मा. श्री. राजन विचारे, लोकसभा सदस्य, यांच्या खासदार निधीतुन मंजुर झालेले आहेत. सदर फुट ओव्हर ब्रिज बांधण्याचा एकुण खर्च रु.2,17,93,000/- एवढा असल्याने मा. महासभा दि.30/01/2016 ठराव क्र.113 अन्वये रु.74.93 लक्ष (सुमारे 75.00 लक्ष) रकमेव्यतिरिक्त रु.1,42,93,000/- एवढा निधी महानगरपालिकेच्या निधीतुन करुन खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता दिल्यानुसार निविदा प्रक्रीया करुन कंत्राटदार यांना कार्यादेश देण्यात आलेले होते.

दरम्यानच्या काळात राष्ट्रीय महामार्ग क्र.08 वरुन मिरा-भाईंदर शहरासाठी मेट्रो प्रकल्प मंजुर झाल्याने सदर फुटओव्हर ब्रीज च्या जागेची तपासणी करणे आवश्यक झाले. मी स्वत: पाठपुरावा करून नाहरकत पत्र घेऊन देतो असे बैठकीत झालेल्या चर्चेत समक्ष सांगितले, त्यानुसार एम.एम.आर.डी.ए. व भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांना पत्र पाठवून नाहरकत पत्र मागण्यात आले आहे. एम.एम.आर.डी.ए. यांनी पांडुरंगवाडी सम्राट हॉटेल जवळील मेट्रो स्टेशन संपल्यावर (मिरा-भाईंदर कडे) फुट ओव्हर ब्रीज बांधण्यास हरकत नसल्याचे कळविलेले आहे.

वरील परिस्थिती पहाता खासदार निधी व मनपा निधीतुन मंजुर फुट ओव्हर ब्रिज बांधणेबाबत तसेच खासदार निधी व्यतिरिक्त लागणारा निधी मनपा निधीतुन करावा लागणार असल्याने सदर प्रस्तावाबाबत विचार विनिमय होऊन निर्णय होण्यास शिफारस आहे.

15/1/19

**(बालाजी खतगांवकर)**
**आयुक्त**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-4/2018-19/DK/MG-11

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान व वृक्ष प्राधिकरण विभाग

मा. महासभा दि.   /   /2019

**(महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम अनुसूची "ड" प्रकरण क्र. 02 कलम 1 (के) अन्वये)**

// गोषवारा //

**प्रकरण क्र. :-** **सन 2019 मधील 33 कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाअंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कांदळवण रोपांची लागवड करणे कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेबाबत.**

उपरोक्त विषयानुसार महाराष्ट्र शासनाच्या सन 2017 ते 2019 या वर्षा मध्ये जुन-जुलै महिण्यात 3 वर्षाच्या कालावधी मध्ये 50 कोटी वृक्ष लागवड करण्याचा उद्दीष्टे आहे. त्यानुसार सन 2019 मध्ये 33 कोटी वृक्ष लागवड करणेकामी कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला असून त्याचे नियोजन आराखडा व कृती कार्यक्रम तयार करून अमंलबजावणी करण्याबाबत मा.मंत्री, वने व महसूल, यांनी दि.26/06/2018 रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते.

तसेच मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष 50 कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम, ठाणे, यांनी वृक्ष लागवडीचे यंत्रणानिहाय व कार्यलय निहाय वृक्ष लागवडीचे उध्दिष्ठ वाटप करण्यात आलेले असून मिरा भाईंदर महानगरपालिका करिता एकुण 60 हजार वृक्ष लागवडीचे उध्दिष्ठ देण्यात आलेले असून क्रमांक/33कोवृला/कावि-399/2018 दि.01/10/2018 रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. सदर उध्दिष्टांच्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सन 2019 मध्ये मोठया प्रमाणावर कांदळवण (Mangroves) व वनीकरणाच्या रोपांची लागवड करण्यात येणार आहे.

मिरा भाईंदर शहराला मोठया प्रमाणात सागरी किनारा लाभलेला आहे. सागरी किनारपटटीलागत मोठया प्रमाणात (Mangroves) कांदळवणाची वाढ चांगल्या प्रकारे होते. खा-या पाण्यात सर्वसाधरणपणे भरतीच्या पाण्याच्या पातळीपासुन ते ओहीटीच्या पाण्याच्या पातळीदरम्यान पटटयात ही कांदवळण आढळते. या वनस्पतीची पाने चिवट व हिरवीगार असतात. कांदवळणाची लागवड दलदलयुक्त् क्षार जमीन व दुषित पाणी असेलेल्या ठिकाणी वाढ चांगली होते.

कांदळवण हे जमिन आणि समुद्र यामधील बफर झोनचे काम करत असुन भरती ओहोटीमुळे होणा-या जमिनीची धुप थांबवते. तसेच कांदळवण हे समुद्रातील विविध जातीचे संरक्षण व संवर्धनाचे काम करते व जागतिक तापमान वाढीमुळे होणा-या नैसर्गिक आपत्तीपासुन संरक्षण करण्याचे काम करते.

कांदवळणाच्या दाट झाडीमुळे समुद्र व जमीन तसेच खाडी किनार व त्यावरील प्रदेश यांत एक हिरवी भिंत निर्माण होते त्यामुळे किना-या जवळच्या जमिनीची पाण्यापासनु होणारी धुप थांबते. भुसंरक्षणाच्या दृष्टिने या वनस्पती अतिशय महत्वाच्या आहेत. कांदवळणामुळे (Mangroves) इतर वनस्पती व जीवसृष्टिचे संरक्षण होते. जलचर प्राण्यांना संरक्षण मिळते. मासे,खेकडे,झिंगे वैगरे प्राणी येथे अंडी घालतात पिल्ली मोठी झाली कि समुद्राकडे जातात. कांदवळणाची (Mangroves) वने असलेल्या सर्व ठिकाणी सागरी लाटांपासुन संरक्षण मिळते त्यामुळे ख-या अर्थाने ते तटरक्षकाची भुमिका चोख बजावतात. त्यामुळे जैवविविधते (Bio- Divercity) मध्ये वाढ होते एकंदरीत संपुर्ण जीवन साखळी या भागात आकाराला येऊ शकते त्यासाठी खाडीचा भाग कांदवळणाने समृध्द राहणे आवश्यक आहे. तसेच बॅक वॉटर, खाडी या भागात केवळ कांदवळणाच्या अस्तित्वामुळे किती जैवविविधता असु शकते याचे उत्तम उदाहरण म्हणजे पश्चिम बंगालचा सुंदरबन प्रदेश आहे. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कांदळवणांची लागवड करुन निगा व देखभाल करणे आवश्यक आहे.

सन 2011 मध्ये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील वृक्षगणना करण्यात आलेली होती त्यानुसार मिरा भाईंदर शहराच्या उत्तर, दक्षिण-पश्चिम आणि उत्तर-पुर्व भागात कांदवळणाच्या एकुण 10 प्रजातीसह **20.7 $Km^2$ क्षेत्र** कांदवळणाचे आढळुन आलेले असुन सदर ठिकाणी खालीलप्रमाणे कांदवळणाची जाती आढळुन आलेल्या आहेत.

| Sr.no | Botanical Name | Common Name |
|---|---|---|
| 1 | Avicennia marina ( Forsk ) Vierh | Tivar |
| 2 | Excoecaria agallocha . | Huri, Geva, Phungi |
| 3 | Rhizophora mucronata Lamk | Kandal |
| 4 | Avicennia officinalis Linn. | Tivar |
| 5 | Ceriops tagal ( per) C. B. Robinson | Kirkiri |
| 6 | Agiceras corniculatum (L.) Blanco | Sugandha |
| 7 | Sonneratia apetala Buch. Ham | Chipi |
| 8 | Bruguieraq cylindrical ( L.) Bl. | Kandal |
| 9 | Lumnitzera racemosa Wild | -- |

पर्यावरण संरक्षण व प्रदुषण नियंत्रण् कायदा 1986 अन्वये प्रदुषणमुक्त्, आरोग्य पुर्ण जीवन जगणे हा प्रत्येक नागरीकाचा हक्क् आहे. या गोष्टीसाठी पुरक म्हणुन शासनाने विविध कायदे केले असुन त्या सर्वाचा समावेश करणारा पर्यावरण (संरक्षक) अधिनियम 1986 हा अतिशय महत्त्वपुर्ण असा कायदा आहे.

कांदळवणाचे संरक्षण् व संवर्धन करण्यासाठी मा. उच्च् न्यायालयात दाखल रिट याचिका क्र. 3246/04 मध्ये दिनांक 06/10/2005 रोजी आदेश पारित केले आहेत. त्याअनुषंघाने महाराष्ट्र शासनाने, दि. 21/10/2005 रोजी शासन परिपत्रक निर्गमित केले आहे. तसचे कांदळवण संवर्धनाबाबत मा. उच्च् न्यायालयाने वेळोवेळी आदेश पारित केले आहेत.

सन 2018 -19 या आर्थिक वर्षात **"वृक्षारोपन / सामाजिक वनिकरण/निसर्ग उद्यान" / "कांदळवण लागवड"** या लेखाशिर्षा अंतर्गत तरतुद करण्यात आलेली आहे.

तरी सन 2019 मधील 33 कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाअंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कांदळवण रोपांची लागवड करणेकामी निविदा मागविणे व त्याकामी येणाऱ्या कामाच्या रु. 1.00 कोटी खर्चास मा. महासभेची प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळणेस शिफारस आहे.

आयुक्त
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

गोषवारा प्राप्त दि. 9७/0७/२०१९ वेळ 02:30 PM
~~प्रा. स्थायी~~ समिती / मा. महासभा गोषवार नोंद
रजिस्टर अ. क्र. ८३ वर्ष :- २०१८-१९

९७/०७/२०१९

लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका